स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील पारंपारिक खेळाच्या खेळाडूंवर सामाजिक आर्थिक परिस्थितीचा कार्यक्षमतेवर होणाऱ्या परिणामाचा अभ्यास

शारीरिक शिक्षण विद्याशाखेच्या शारीरिक शिक्षण विषयात विद्यावाचस्पती

(वाचस्पती) पदवीसाठी

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे सादर

करावयाचा संशोधन आराखडा

संशोधक

अंकुश अभिमन्यु सोळंके

मार्गदर्शक

प्रा.डॉ. गुरुदास आ.लोकरे

एम.फील, पीएच.डी.,शारीरिक शिक्षण संचालक,

शारदा महाविद्यालय, परभणी, महाराष्ट्र

अनुक्रमणिका

		पृ.क्र.
अ. प्रस्तावना	-	02
1. खो-खो	-	02
2. कबड्डी	-	03
3. संशोधन विषयाचे महत्व	-	03
4. समस्येचे कथन	-	04
5. संशोधनाची उद्दिष्ट्ये	-	04
6. संशोधनाची परिकल्पना	-	05
7. संशोधनाची व्याप्ती	-	05
8. संशोधनाची मर्यादा	-	05
ब. संशोधन साहित्याचा आढावा.	-	**06**
क. संशोधन पध्दती		
1. संशोधन स्थान	-	07
2. आंतरमहाविद्यालय अंतर्गत कब्बडी व खो-खो खेळाडूची निवड	-	07
3. चल	-	07
4. संशोधन पध्दती	-	08
5. माहीती संकलणाच्या पध्दती	-	08
i. प्रकरण	-	09
ii. संदर्भ सूची	-	09

अ. प्रस्तावना :

कबड्डी, खो-खो, मातीतील कुस्ती, मलखांबस, आट्यापाट्या असे बिनसाधनांचे किंवा अल्प साधनांचे खेळ हे महाराष्ट्रीयीन व भारती यसंस्कृतीचे अविभाज्य घटक आहेत.

भारतातील खे कबड्डी व खो-खो आकर्षक या खेळाचे आकर्षण आशिया खंडातले मोजके देश वगळता इतरांना वाटतच नाही. ही भारतीय देशी क्रीडाप्रेमींची खंत आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे, खेळांचे पदाधिकारी प्रचार व पर्यायाने प्रसार करण्यात कमी पडतात. तसेच बहुतांश खेळाडूंमध्ये खिलाडू वृत्तीचा अभाव दिसून येतो अशा अखिलाडू वृत्तीने वागणाऱ्या खेळाडूंवर शिस्तभंगाची आवश्यक ती कारवाई केली तर खेळाडू बेशिस्त वर्तन करणार नाहीत. फलस्वरुप या खेळात शिस्त येऊन खेळांचे आकर्षण वाढेल व जगभरातील अनेक देश या दर्जेदार खेळाकडे आकर्षिले जातील खेळाचा प्रसार झाल्यास त्याला जागतिक दर्जा प्राप्त होऊन नवनवीन तंत्राची भर पडून खेळाचा उत्तरोत्तर प्रसार होऊ शकेल जेणेकरुन क्रिकेट बरोबर या खेळांचीही दखल घेतली जाईल.

1. **खो-खो**

खो-खो हाखेळ भारतीय पारंपारिक खेळांपैकी सर्वात वेगवान खेळ असून महाराष्ट्राच्या भूमीतच या खेळाची सुरुवात झाली खो-खो हा भारतीयसंस्कृतीचा अविष्कार व अनमोल ठेवा आहे. संत तुकारामाच्या वाड्मयातही खो-खो खेळांशी पूरक आट्यापाट्या खेळाचा उल्लेख आढळतो. खो-खो व पूर्वीचे स्वरुप धावणे व पाठलाग या दोन क्रियांवर आधारित होते. खो-खो पाठलागांचा खेळ आहे. भारतीय खेळांना लोकप्रिय बनविण्यासाठी इ.स. 1914 मध्ये पुण्याच्या डेक्कन जिमखान्यातर्फे विविध संघांना आमंत्रित करुन सामने भरवले गेले. आज खो-खो या भारतीय खेळाला व्यापक

प्रसिध्दी मिळाली असून बहुतेक भारतीय यांनी या खेळाचे काही नियम तयार केले व 1943-44 मध्ये खो-खो फेडरेशन ऑफ इंडियाची स्थापना झाली.

2. कबड्डी

कबड्डी हा आपला सर्वात प्राचीन खेळ आहे. या खेळाचा नेमका उगम कसा व केंव्हा झाला, या विषयी निश्चित अस काहीच सांगता येत नाही. परंतु प्रत्येक राज्यात थोड्याफार फरकाने हा खेळ खेळा जात असे. आपणास दिसून येते कबड्डी हा मराठमोळ्या मातीशी मस्ती करणारा थोडासा धसमुसळा खेळ हा वैभवाच्या सिंहासनावर नसला तरी वैभवाच्या चौकटीला निश्चित स्थिरावू लागला आहे. हा विकास काही सहजासहजी झालेला नाही अंगाला व्यायाम देणार आणि ताकदीची रग जिरवणारा, भारतातील जुना खेळ आणि जुना व्यायामप्रकार, विविध प्रकारे खेळला जाणारा, हजारोंना आकर्षून घेणारा, परंतू ढोबळ मानाने नियमबध्द झालेला हुतूतू, निश्चित नियमांच्या आधारे आखीव रेखीवपणे सादर केली जाणारी कबड्डी ही एकाच खेळाची विविध जमान्यातील परंतू याच देशातील रुपे आहेत. कबड्डी हा वेगवान केळ आहे. प्रत्येक चढाईला विश्लेषणात्मक क्रिया प्रतिक्रिया होतात चढायांपेक्षा पकड हा विषय तसा दुर्लक्षित होता. खेळाडूंच्या गुणांमध्ये पकडीच्या गुणांचाही समावेश हवा.

3. संशोधन विषयाचे महत्व

कबड्डी आणि खो-खो हा खेळ महाराष्ट्रीय लोकप्रिय खेळ होय. आजच्या परिस्थितीचा विचार करता या खेळात मोठी उणीव निर्माण झालेली दिसते. खेळाकडे बघण्याचा दृष्टीकोन आणि समाजाची उदासीनता यासारखी कारणे असू शकतात. त्यामूळे वस्तुस्थिती काय आहे हे शोधण्यासाठी संशोधनाने प्रयत्न केलेला आहे. स्वा.रा.ती.म. विद्यापीठ नांदेड येथील पारंपारिक खेळाच्या खेळाडूवर सामाजिक, आर्थिक परिस्थितीचा कार्यक्षमतेवर होणाऱ्या परिणामाचा अभ्यास यासाठी कबड्डी, खो-

खो याखेळाडूची निवड करुन योग्य अशा संशोधन पध्दतीचा उपयोग करुन त्यांच्या जगण्यावर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न केलेला आहे. विद्यापीठातील खेळाडूचा दर्जा उंचावण्यासाठी कार्य करणे हा मुख्य उद्देश होय.

4. समस्येचे कथन

आंतर महाविद्यायीन पुरुष कबड्डी व खो-खो खेळातील सहभाग, प्रमाण व कामगिरी हे पुर्णत: सामाजिक व आर्थिक घटकांवर अवलंबून असते. आजही पारंपारिक खेळाची वाद व खेळाडूंची कामगिरी लक्षात ठेवून आंतर महाविद्यालयीन खेळाडूंची कामगिरीवर लक्ष केंद्रीत करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

5. संशोधनाची उद्दिष्ट्ये

1. महाविद्यालयीन स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खो-खो खेळाडूंच्या सामाजिक समस्यांचा अभ्यास करणे.
2. महाविद्यालयीन स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खो-खो खेळाडूंच्या आर्थिक समस्यांचा अभ्यास करणे.
3. महाविद्यालयीन स्पर्धेत सहभागी होणाऱ्या कबड्डी खेळाडूंच्या सामाजिक समस्यांचा अभ्यास करणे.
4. महाविद्यालयीन स्पर्धेत सहभागी होणाऱ्या कबड्डी खेळाडूंच्या आर्थिक समस्यांचा अभ्यास करणे.
5. खो-खो व कबड्डी खेळाडूंच्या सामाजिक परिस्थितीचा तुलनात्मक अभ्यास करणे.
6. खो-खो व कबड्डी खेळाडूंच्या आर्थिक परिस्थितीचा तुलनात्मक अभ्यास करणे.
7. कबड्डी व खो-खो या खेळाडूंना खेळात येणाऱ्या अडीअडचणीचा अभ्यास करणे.

6. संशोधनाची परिकल्पना

1.सामाजिक दृष्ट्या खो-खो खेळाडू मध्ये तफावत असू शकते.

2. सामाजिक दृष्ट्या कबड्डी खेळाडू मध्ये तफावत असू शकते.

3. आर्थिक दृष्ट्या खो-खो खेळाडू मध्ये तफावत असू शकते.

4. आर्थिक दृष्ट्या कबड्डी खेळाडू मध्ये तफावत असू शकते.

5. सामाजिक दृष्ट्या खो-खो व कबड्डी खेळाडू मध्ये तफावत असू शकते.

6. आर्थिक दृष्ट्या खो-खो व कबड्डी खेळाडू मध्ये तफावत असू शकते.

7. खो-खो व कबड्डी खेळाडूंना केळात विविध समस्यांना आव्हान द्यावा लागते.

7. संशोधनाची व्याप्ती

1. आंतर महाविद्यालयीन पुरुष कबड्डी खेळाडूंची सामाजिक परिस्थिती समजण्यास मदत होईल.

2. आंतर महाविद्यालयीन पुरुष कबड्डी खेळाडूंची आर्थिक परिस्थिती लक्ष्यात येईल.

3. आंतर महाविद्यालयीन पुरुष खो-खो खेळाडूंची सामाजिक परिस्थिती समजण्यास मदत होईल.

4. आंतर महाविद्यालयीन पुरुष खो-खो खेळाडूंची आर्थिक परिस्थिती लक्ष्यात येईल.

8. संशोधनाची मर्यादा

1. फक्त आंतर महाविद्यालयीन कबड्डी खेळाडू निवड करणेच मर्यादीत आहे.

2. फक्त आंतर महाविद्यालयीन खो-खो खेळाडू निवड़ करणेच मर्यादीत आहे.

3. स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड हे संशोधनाचे मुख्य परिक्षेत्र आहे.

4. आंतर्गत आंतर महाविद्यालयीन कबड्डी, खो-खो स्पर्धेत भाग घेणाऱ्या उदय खेळाडू करणेच मर्यादीत आहे.

ब. संशोधन साहित्याचा आढावा.

वसंत पाटील (2006)

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील आंतर महाविद्यालयीन क्रिडा स्पर्धेत महिला खेळाडूंच्या अल्प सहभागावर परिणाम करणाऱ्या सामाजिक, आर्थिक व मानसिक घटकांचा एक चिकित्सक अभ्यास या संशोधन विषयावर अभ्यास केला.

उद्योन्मुख महिला खेळाडूंपूढे काही आदर्श असतात. या आदर्शाची प्रतिमा समोर ठेवून महिला खेळाडू त्या दिशेने वाटचाल करु लागतात. असे आदर्श त्यांना उक्तीने व कृतीने अनुसरता येतात. बऱ्याच वेळी त्याच्या आत्मकथा वाचून तसेच त्यांचे आदर्श समोर ठेवून पुढील वाटचाल केली जाते. अशा प्रतिसादासही अभ्यास पोषक ठरु शकेल.

गणेश शेट्टी (2012)

कोणत्याही खेळाडूला आर्थिक विवंचना नसेल तर तो शांतचित्ताने आपल्या खेळाकडे लक्ष एकाग्र करु शकतो आणि म्हणूनच कबड्डीपटुला आर्थिक स्थैर्य मिळणे अत्यावश्यक आहे. राष्ट्रीय स्तरावर खेळणाऱ्या कबड्डीपटूला मासिक विशिष्ट मानधन मिळण्याची व्यवस्था असायला हवी. या शिवाय दर्जेदार खेळ करणाऱ्या कबड्डी पटुंकरिता नोकऱ्यांची उपलब्धता होणेही तितकेच महत्वाचे आहे.

एशियाडमध्ये कबड्डीच्या समावेशाच्या वेळी वजन हा निकष तयार करण्यात आला, वजनानुसार वर्गीकरण झाल्याने राष्ट्रीय स्तरावर सर्वच संघांना विजयाची समान संधी आहे. महाराष्ट्रात जिल्हा, राज्य पातळ्यांवर खेळाडूंच्या निवडीची अतिशय सुयोग्य यंत्रणा आहे.

यामुळे खेळाडू आणि पालक यांनी विचारांची चौकट भेदत क्रिकेटपलीकडे विचार करणे आवश्यक आहे. बदलाची हीच योग्य वेळ असूनयाकरिता त्यांनी पुढाकार घेणे आवश्यक आहे. यासाठी मध्यमवर्ग आणि उच्च मध्यमवर्गीयांनी या खेळाकडे वळले पाहिजे. शाळा महाविद्यालयांमध्ये कबड्डी खेळ अनिवार्य केला पाहिजे. ऑलिम्पिकमध्ये भारताचा संघ असावा यासाठी कबड्डी महासंघाचे प्रयत्न सुरु आहे. 2016 साली होणाऱ्या ऑलिम्पिकमध्ये भारताचा कबड्डी संघ, नक्कीच असेल, केवळ संध्याकाळी 6 ते रात्री 10 याकालावधीत खेळायचा खेळ असा कबड्डी बाबत संकुचित विचार न करता, या खेळाकरिता सर्वस्व झोकून देणार्या व्यक्तिंची आवश्यकता आहे.

क. संशोधन पध्दती

1. **संशोधन स्थान**

   स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड अंतर्गत येणाऱ्या महाविद्यालय कबड्डी व खो-खो खेळाडूंची निवड करण्यात येईल.

2. **आंतर महाविद्यालय अंतर्गत कबड्डी व खो-खो खेळाडूंची निवड**

   मागील 5 वर्षा मध्ये 150 आंतर महाविद्यालयीन कबड्डी व 150 खो-खो खेळाडूंची निवड करण्यात येईल.

3. **चल**

   1. सामाजिक परिस्थिती चल
   2. आर्थिक परिस्थिती चल
   3. कामगिरी

4. संशोधन पध्दती : सर्वेक्षण संशोदन पध्दती

1. सांखकीय तंत्र

1. वारंवारिता

2. मध्यमान

3. टी परीक्षण

4. टक्केवारी

5. माहिती संकलणाच्या पध्दती / साधने

1. प्राथमिक तथ्य सामग्री अथवा स्त्रोत

अ. प्रश्नावली

2. दुय्यम तथ्य सामुग्री

i. प्रकाशित व अप्रकाशित कागदपत्रे

ii. अहवाल

iii. जीवनी

iv. पाडुलिपी

v. आत्मचरित्र

vi. सस्मरण

vii. दैनंदिनी

viii. पत्रे

i. प्रकरण

प्रस्तुत संशोदनामध्ये पूढील प्रकरणाचा समावेश करण्यात येईल.

प्रकरण 1	:	प्रस्तावना
प्रकरण 2	:	संशोधन साहित्याचा आढावा
प्रकरण 3	:	संशोधन पध्दती
प्रकरण 4	:	माहितीचे पृथ:करण व सांख्यिकीय विश्लेषण
प्रकरण 5	:	सारांश निष्कर्ष, सूचना व शिफारशी

ii. **संदर्भ सूची** :

1. पाटील वसंत (2006) डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील आंतर महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेत महिला खेळाडूंच्या अल्प सहभागावर परिणाम करणाऱ्या सामाजिक, आर्थिक व मानसिक घटकांचा एक चिकित्सक अभ्यास, पीएच.डी. शोध प्रबंध, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद, पृ. 54 ते 69, 279, 280.
2. शेट्टी गणेश, खेळाडूंना आर्थिक स्थैर्य मिळायला हवे, एक्सप्रेस टावर्स, नरिमन पॉईट, मुंबई दैनिक मराठी लोकसत्ता, 8 जाने. 2012, पृ.क्र. 12.
3. गंदगे, के.एन., शारिरीक शिक्षणाचा इतिहास आणि पाया, 2002, समर्थ प्रकाशन नांदेड.
4. माने, एच.ए. शैक्षणिक व शारीरिक शिक्षण संशोधन 2006 विजय प्रकाशन, नांदेड.

संशोधक	**मार्गदर्शक**
अंकुश अभिमन्यु सोळंके	डॉ. गुरुदास आ.लोकरे